IO

53

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

1. **District (जिल्हा):** पालघर **P.S.(ठाणे):** तलासरी

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0220 **Year (वर्ष):** 2023

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**04/09/2023 21:43

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7(a) |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** सोमवार **Date From (दिनांक पासून):** 04/09/2023

**Time Period (कालावधी):** पहर 2 **Date To ( दिनांक पर्यंत):** 04/09/2023

**Time From (वेळेपासून):** 04:58 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 04:58 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 04/09/2023 **Time (वेळ):** 21:08 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 026

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 04/09/2023 21:08 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

दक्षिण, 3 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** राष्ट्रिय महामार्ग 48 ,दापचरी, दापचरी,डहाणु, 401602

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** राजेंद्र जगन्नाथ वाघ
(b) **Guardian's Name (पालक चे नाव) :** जगन्नाथ वाघ
(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1980
(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत
(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**
(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**
**Date of Issue (दिल्याची तारीख):**
**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**
(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | सेक्टर -2,एलआयजी आय- बी 26,मुंबई पनवेल रायगड,पनवेल,तलासरी, पालघर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | 5/56,टिजेरोड,पांडे पत्रा चाळ,शिवडी,शिवडी,तलासरी,पालघर,महाराष्ट्र, भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**
(j) **Phone number (फोन नं.):**
**Mobile (मोबाइल नं.):** 91-9987600545

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | निळोबा ज्योतिबा तांदळे | | वडील का नाम : ज्योतिबा तांदळे | 1. 1202,ओम साई को आप हौसिंग सोसायटि,,सेक्टर नंबर 07,खारघर, नवी मुंबई,नवी मुंबई,तलासरी,पालघर,महाराष्ट्र भारत |
| 2 | सुनिल सदाशिव भोईर | | वडील का नाम : सुनिल सदाशिव भोईर | 1. सिवील हास्पिटल समोर,ढोबळी आळी,,मित आर्केड,टेंभी नाका ठाणे,तलासरी,पालघर,महाराष्ट्र |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे)**:**

**9. Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील)**:**

| **S.No.** (अ.क्र.) | **Property Category** (मालमत्ता वर्ग) | **Property Type** (मालमत्ता प्रकार) | **Description** (वर्णन) | **Value(In Rs/-)** (मुल्य (रु. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | कागदी चलन300/ रुपये | 300.00 |

**10 Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

300.00

**11. Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| **S.No.** (अ.क्र.) | **UIDB Number** (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12. First Information contents** (प्रथम खबर हकीकत )**:**

फिर्याद दि. 04/09/2023

माझे नांव राजेंद्र जगन्नाथ वाघ, वय- 43 वर्षे, धंदा- चालक, राहणार- रूम नंबर 5/56, पांडे पत्रा चाळ, भारत
इंडस्ट्रियल इस्टेट समोर, टि.जे.रोड, शिवडी, मुंबई - 400015 सध्या राहणार- श्री. नौशाद मुबारक मुजावर यांच्या
एल.आय.जी. आय- बी 26, 3 रा मजला, सेक्टर -2, पनवेल, रायगड, नवी मुंबई पनवेल रायगड (सी.टि)
410218 येथे भाडे तत्वावर, मोबाईल क्रमं◌ाक 9987600545, 9372878260
समक्ष हजर राहुन फिर्याद देतो कि, मी वरील ठिकाणी पत्नी, 2 मुले यांच्यासह वास्तव्यास असुन मी गेल्या 25
वर्षासुन ड्रायव्हिंग काम करतो. माझ्याकडे डी एल एम एच 0119980038453 हा ट्रान्सपोर्ट वाहन चालविण्याचा
परवाना आहे. मी श्री. दिलबाग सिंग, रा.कळंबोली, नवी मं◌ुबई, मोबाईल क्रमं◌ाक 9324004484 यं◌ाना
गेल्या 08 वर्षासुन ओळखतो. त्यांचा एक ओंकार ट्रान्सपोर्ट नावाचा ट्रान्सपोर्ट व्यवसाय आहे. मी त्यं◌ाचे ट्रान्सपोर्ट
वाहनांवर चालक म्हणुन काम करतो. सदरील वाहनें मुंबई ते अहमदाबाद चालवितो. राष्ट्रिय महामार्ग 48 वर तलासरी
( दापचरी ) आर.टि.ओ. चेक पोस्ट आहे. तेथील मोटार वाहन निरीक्षक म्हणुन काम करणा-या अधिकारी श्री.
सतिश खरवडकर, अमित गांगल, दिनेश बागुल, उज्जवल भावसार व खाजगी इसम नामे श्री. सुनिल भोईर हे
मालवाहतुक वाहनांकडुन एन्ट्री ( आर.टि.ओ. चेक पोस्ट ओलांडण्यास तोंडी परवानगी देण्याचे मोबदल्यात ) चे पैसे
घेणारे यं◌ाना मी ओळखतो. ते मुंबई येथुन गुजरात राज्यात प्रवेश करताना तलासरी ( दापचरी ) आर.टि.ओ. चेक
पोस्ट वर मालवाहु वाहनाचे वजन, वाहनाचा फिटनेस, मालाची बिल्टी इत्यादी तपासण्याचे कारण करून मालवाहु
वाहने अडवितात व महाराष्ट्र राज्यातुन राष्ट्रिय महामार्ग 48 वर तलासरी ( दापचरी ) आर.टि.ओ. चेक पोस्ट
ओलांडण्यास तोंडी परवानगी देण्याचे मोबदल्यात प्रत्येक वाहनामागे 200 ते 300 रूपये लाचेची मागणी करून
तात्काळ स्विकारतात आपण त्यांना काही कमी करा अशी विनंती केल्यास ते वाहनामध्ये काही ना काही कारण
शोधुन 1000/- रूपये विनाकारण दंड करतात.
काल दिनांक 03/09/2023 रोजी मला माझे मालक नामे श्री. दिलबाग सिंग, रा.कळंबोली, नवी मं◌ुबई यं◌ानी
सांगितले की, त्यं◌ाचे मित्र नामे हिरेन एम मेहता, राहणार- श्रेयस सोसायटि, रेस कोर्स रिंग रोड, राजकोट, गुजरात
- 360001 यांचे वाहन क्रमांक जी जे 03 बी झेड 5198 हे राष्ट्रिय महामार्ग 48 वर तलासरी ( दापचेरी ) आर.
टि.ओ. चेक पोस्ट जवळ असुन ते मुंबई बाजु कडुन गुजरात बाजु कडे पास करून घेऊन जा त्यानंतर ते मला पुढे ते
वाहन कोठे घेऊन जायचे हे सांगणार आहेत. त्यांना मी राष्ट्रिय महामार्ग 48 वर तलासरी ( दापचेरी ) आर.टि.ओ.
चेक पोस्ट वर आर. टि. ओ. चे अधिकारी व त्यांचे हाताखाली काम करणारे खाजगी इसम नामे श्री. सुनिल भोईर हे
सदरील चेक पोस्ट पास करण्यासाठि 200 ते 300 रूपये घेतात असे सं◌ागितले असता त्यांनी मला लाचलुचपत
प्रतिबंधक विभाग कडे तक्रार करण्यास सांगितले आहे.

मी उद्या दिनांक 04/09/2023 रोजी पहाटे चे सुमारास राष्ट्रिय महामार्ग 48 वरून मुंबई दिशेकडुन गुजरात दिशेकडे तलासरी (दापचरी ) आर.टि.ओ. चेक पोस्ट येथुन जाणार आहे. त्याठिकाणी आर.टि.ओ.चे अधिकारी हे माझ्या ताब्यातील मालवाहु वाहनाचे वजन तपासण्याचे कारणावरून माझ्या ताब्यातील वाहन थांबवतील व मला वाहनाचे वजन, फिटनेस व परमिट तपासण्याचे कारण सांगुन 200 ते 300 रूपये लाचेची मागणी करून तात्काळ स्विकारतील याची मला खात्री आहे. व मी त्यांनी मागणी केलेली लाचेची रक्कम न दिल्यास ते माझे वाहन पुढे जाऊ देणार नाहीत व मला 1000/- रूपये विनाकारण दंड करतील.

आज दिनांक 03/09/2023 चे 22/00 वाजे ते दिनांक 04/09/2023 रोजीचे 06/00 वाजे दरम्यान तलासरी ( दापचेरी ) आर.टि.ओ. चेक पोस्ट येथे डयुटीस असणा-या वरील नमुद अधिकारी अथवा खाजगी इसम नामे श्री. सुनिल भोईर यांच्यात व माझ्यात काहीएक वैमनस्य नसुन मी त्यांना काहीएक उधार देणे लागत नाही. मला त्यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांचेवर कायदेशिर कारवाई करण्यात यावी. यासाठी मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक कडील पोलीस निरीक्षक श्री.संदिप घुगे यांना दिनांक 03/09/2023 रोजी संपर्क करून तक्रार सांगीतली.

मी दिलेल्या तक्रारीचे अनुशंगाने दिनांक 03/09/2023 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक कडील पोलीस निरीक्षक श्री संदीप घुगे यांनी माझी सविस्तर तक्रार नोंदवुन घेतली. तेथे मला पडताळणी व यषस्वी सापळा कारवाई एकाच वेळी करणे असल्याने त्याकामी सुचना दिल्या व तयारी करून माझेसोबत व्हाईस रेकाॅर्डर देवून, पंच श्री. घंटे व ते स्वतः पोलीस निरीक्षक संदीप घुगे असे राष्ट्रिय महामार्ग 48 वरून मुंबई दिशेकडुन गुजरात दिशेकडे माझ्या ताब्यातील मालवाहु वाहन क्रमांक जी जे 03 बी झेड 5198 ने व उर्वरीत सापळा पथक खाजगी वाहनाने रवाना झालो. असता तलासरी ( दापचरी ) आर.टि.ओ. चेक पोस्ट येथे मी माझ्या ताब्यातील वाहन क्रमांक जी जे 03 बी झेड 5198 चे महाराष्ट्र बाॅर्डर चेक पोस्ट नेटवर्क लिमिटेड येथे Transaction No;- 1011080409230118 अन्वये वजन केले व 190/- रूपये फि अदा केली. त्यानंतर माझे ताब्यातील वाहन तलासरी ( दापचरी ) आर.टि.ओ. चेक पोस्ट च्या आवारात नेऊन उभे केले. मी व पंच क्रमांक 01 श्री. घंटे असे सदरील चेक पोस्ट च्या कार्यालयात गेलो तेथे मोटार परिवहन विभागाचे अधिकारी तांदळे हे खाकी गणवेशामध्ये उभे होते. त्यांच्या बाजुस खुर्चीमध्ये खाजगी इसम नामे श्री. सुनिल भोईर हा बसलेला होता. त्यांना माझे ताब्यातील वाहनाचे परमिट दाखविले असता त्यांनी मला '' हे काय आहे '' त्यावर मी त्यांना परमिट आहे असे सांगितले. व वाहनाचा क्रमांक जी जे 03 बी झेड 5198 असा सांगितला व काय दयायच साहेब ? असे विचारले असता त्यानी '' तिनशे '' असे म्हणुन माझ्या ताब्यातील वाहन तलासरी ( दापचरी ) आर.टि.ओ. चेक पोस्ट येथुन गुजरात राज्याच्या दिशेने जाऊ देण्यास तोंडी परवानगी देणेकामी 300/- रूपये लाचेची मागणी केली. त्यावर मी त्यांना '' साहेब गाडी रिटर्न चालवली आहे, काही कमी नाही होणार ? असे विचारले असता त्यांनी '' एकाच वेळी जा हजार रूपयाची पावती कापा, जावा '' असे म्हणुन माझ्या ताब्यातील वाहनास विनाकारण दंड केल्या शिवाय सोडले जाणार नाही असा इशारा दिला. त्यावेळी मी ओळखत असलेले मोटार वाहन निरीक्षक श्री. निळोबा तांदळे हे सर्व बोलणे ऐकत होते. तेव्हा मी खाजगी इसम नामे श्री. सुनिल भोईर यांना '' अस नाही साहेब अस नका करू '' अशी विनंती केली असता त्यांनी मला '' जे आहे ते बोलले तुम्हाला, जे चाललंय ते... असे म्हणुन तलासरी ( दापचरी ) आर.टि.ओ. चेक पोस्ट येथुन मुंबई अथवा गुजरात कडे जाणा-या व येणा-या मालवाहतुक वाहनांना सदरील आर.टि.ओ.चेक पोस्ट पार करण्यासाठि 300 रूपये ( एंन्ट्री ) लाच दिल्याशिवाय सोडले जाणार नाही याची जाणीव करून दिली. तरी देखिल मी त्यांना '' क्राॅसिंग करायची ये ना गाडी, रिटर्न घेऊन करायची ये त्याच्यासाठि चाललोय असे म्हणुन शेवटी '' काय करायच '' असे विचारले असता त्यांनी '' मी एकदाच सागतो, दहा वेळा नाही सांगत मी.... '' असे म्हणुन मला मागणी केलेली 300/- रूपये लाच तात्काळ देण्यास बजावले म्हणुन मी माझ्याकडे दिलेल्या अॅन्थ्रासीन पावडर लावलेल्या 200/- रूपये दराची एक व 100/- रूपये दराची एक अशा लाचेच्या नोटा काढुन त्यांच्या समोर धरल्या असता त्यांनी त्या तलासरी ( दापचरी ) आर.टि.ओ. चेक पोस्ट कार्यालयात मोटार वाहन निरीक्षक श्री. तांदळे हे त्यांच्या बाजुस उभे असतांना खुर्चीत बसुनच दिनांक 04/09/2023 रोजी 04:58:35 वाजता उजव्या हाताने स्विकारून ते काम करीत असलेल्या टेबलच्या उजव्या हातास असलेल्या ड्रावर मध्ये ठेवुन दिल्या. त्यामुळे मी सदरील खोलीच्या बाहेर येऊन सापळा पथकास दिसुन येईल अशा प्रकारे पुर्वनियोजित इशारा केला असता सापळा पथक सदर ठिकाणी आले. व तेथे हजर असलेले लोकसेवक व खाजगी इसम यांना त्यांचे नांव व पत्ता विचारले असता त्यांनी त्यांचे नांव निळोबा ज्योतिबा तांदळे, मोटार वाहन निरीक्षक, नेमणुक आर.टि.ओ.ठाणे राहणार- फ्लॅट नंबर 1202, ओम साई को आॅप हौसिंग सोसायटि, सेक्टर नंबर 07, खारघर, नवी मुंबई व खाजगी इसम यांनी त्यांचे नांव सुनिल सदाषिव भोईर, वय 62 वर्षे, रा.सिवील हाॅस्पिटल समोर, ढोबळी आळी, मित आर्केड, फ्लॅट नंबर 501, टेंभी नाका, ठाणे असे सांगीतले

असता त्यांना पुढिल कारवाईकामी ताब्यात घेण्यात आले. सदर बाबतचा सविस्तर पंचनामा करण्यात आला आहे.
तरी मी दिनांक 04/09/2023 रोजी माझ्या ताब्यातील वाहन क्रमांक जी जे 03 बी झेड 5198 हे राष्ट्रिय महामार्ग 48 वरून मुंबई दिशेकडुन गुजरात दिशेकडे तलासरी ( दापचरी ) आर.टि.ओ. चेक पोस्ट येथुन घेऊन जात असताना तेथील प्रादेशिक परिवहन विभागाचे कार्यालयात हजर असलेले मोटार वाहन निरीक्षक श्री. निळोबा ज्योतिबा तांदळे यंानी त्यांचे कायदेशीर कर्तव्य पार न पाडता त्यांचे स्वतःचे व त्यांचे सोबत दि. 04/09/2023 रोजी असलेल्या अधिकारी यांचे आर्थिक फायदयाकरीता त्यांच्या अधिनस्थ खाजगी इसम नामे सुनिल सदाशिव भोईर यास तलासरी ( दापचेरी ) आर.टि.ओ. चेक पोस्ट येथील कार्यालयात त्यांचे समक्ष माझ्याकडे राष्ट्रिय महामार्ग 48 वरून मुंबई दिशेकडुन गुजरात दिशेकडे तलासरी ( दापचेरी ) आर.टि.ओ. चेक पोस्ट पास ( ओलांडण्याकरीता ) करण्याकरीता 300/- रूपये लाचेची मागणी करून स्विकारण्याचे बेकायदेशीर असे कृत थाबविणे हे त्यांचे कर्तव्य असताना त्यानंी खाजगी इसम नामे सुनिल सदाषिव भोईर यांच्या बेकायदेशीर कृतीस मज्जाव केला नाही. व भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम 1988 मध्ये नमुद अपराधास अपप्रेरणा देऊन गुन्हेगारी स्वरूपाचे वर्तन केले आहे. म्हणुन माझी सुनिल सदाशिव भोईर व मोटार वाहन निरीक्षक श्री. निळोबा ज्योतिबा तांदळे त्याचेविरूध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन 1988 चे कलम 7 अ, 12 प्रमाणे कायदेशीर फिर्याद आहे.
तसेच तलासरी ( दापचरी ) आर.टि.ओ. चेक पोस्ट येथे दिनांक 03/09/2023 चे 22/00 वाजे ते दिनांक 04/09/2023 रोजीचे 06/00 वाजे दरम्यान मोटार वाहन निरीक्षक श्री. निळोबा ज्योतिबा तांदळे यांचे बरोबर नेमणुकीस असलेले मोटार वाहन निरीक्षक श्री. सतिश खरवडकर, अमित गांगल, दिनेश बागुल, उज्जवल भावसार यंाचा देखिल माझ्याकडे लाचेची मागणी करून सदरील लाचेची रक्कम स्विकारणे हया गुन्हयामध्ये तितकाच सहभाग असण्याचा मला संशय आहे.
माझी वरील फिर्याद माझे सांगणेप्रमाणे व घडल्या घटनेप्रमाणे बरोबर टंकलिखित केलेली आहे.

समक्ष हि फिर्याद दिली.

दिनांक 04/09/2023

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

VIJAY DEVRAM MUTDAK(I (Inspector)) / PI **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

**(4) Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

**14 Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

**15. Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

पोलीस ठाणे अंमलदार
तलासरी पोलीस स्टेशन

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची सवाक्षरी)

**Name** (नाव): VIJAY DEVRAM MUTE
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): PI